तपासी अधिकारी

(37)



# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोपरगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0002 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/01/2025 04:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 02/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2025
**Time From (वेळेपासून):** 11:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/01/2025 **Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2025 04:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** साई रेसिडेन्सी इमारतीचे पार्कि,कोपरगाव

(c)**In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विकास पंढरीनाथ आघाव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्गाची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साईसीटी कोपरगाव,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साईसीटी कोपरगाव,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588602194

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | करण नारायण जगताप | | | 1. यश बंगला, साई विश्व अपार्टमेंट,साईसिटी परिसर, कोपरगाव,,कोपरगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेश वैजिनाथ सोनवणे | | | 1. रो हाउस नं 4 साई हार्मोनी कल,साईसिटी परिसर, कोपरगाव,कोपरगांव,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 13 भारतीय चलनी नोटा | 6,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 03/01/2025

मी विकास पंढरीनाथ आघाव, वय 37 वर्षे, धंदा शेती, रा. साईसीटी कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर, मो.नं. 7588602194.

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि. 01/01/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र. वि.अहिल्यानगर यांना फोन करुन लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि 02/01/2025 रोजी 10/00 वा चे सुमारास कोपरगाव येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 10/15 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी शासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, मी दि. 28/09/2022 रोजी कोपरगाव येथील स.न.207/6/3/10 प्लॉट नं.10 मधिल बांधकाम केलेली साई रेसिडेन्सी या नावाच्या इमारतीमधिल पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.105क्षेत्रफळ26.13 चै.मीटर ही सदनिका खरेदी केलेली आहे. त्याबाबतचे खरेदीखत दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरगाव येथे दस्त क्रमांक4340/2022अन्वये नोंदविण्यात आले आहे.सदर खरेदीखताची नोंद7/12 उता-यावर लावण्यासाठी मी तलाठी कार्यालय, कोपरगाव येथे तीन ते चार वेळा गेलो आहे.परंतु आजपावेतो सदर खरेदीखताची नोंद7/12उता-यावर लागलेली नाही. मी दिनांक 18/12/2024 रोजी कोपरगाव तलाठी कार्यालयात जावुन तलाठी श्री. सोनवणे यांची भेट घेवुन त्यांना माझे वर नमुद सदनिकेच्या खरेदीखताची नोंद7/12उता-यावर लावण्याकरीता विनंती केली असता त्यांनी मला त्यांचे खाजगी मदतनीस श्री.करण जगताप यांना भेटा व त्यांच्याकडे तुमचे खरेदीखताचे कागदपत्र दया आणि ते काय सांगतील त्याप्रमाणे सर्व पुर्तता त्यांच्याकडेच करा असे सांगितले. त्याप्रमाणे मी तलाठी श्री. सोनवणे यांचे खाजगी मदतनीस श्री. करण जगताप यांना दि. 21/12/2024 रोजी भेटलो व तलाठी श्री. सोनवणे यांनी माझे खरेदीखताची नोंद लावण्याकरीता लागणारे कागदपत्र तुमच्याकडे दयायचे सांगितले आहेत असे म्हणालो असता खाजगी इसम श्री. करण जगताप यांनी सांगितले की, तलाठी श्री. सोनवणे यांनी तुमच्या खरेदीखताची नोंद लावण्याकरीता 6000/- रुपये तुमच्याकडुन घ्यायचे सांगितले आहेत व माझे 500/-रुपये असे एकुण 6500/-रुपये माझ्याकडे दया, मी तलाठी श्री. सोनवणे यांच्याकडुन तुमच्या खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावुन घेतो. असे म्हणुन खाजगी इसम जगताप यांनी माझ्याकडे तलाठी सोनवणे यांचेकरीता व स्वतःकरीता लाचेची मागणी केली. मी दि. 31/12/2024 रोजी पुन्हा तलाठी कार्यालय कोपरगाव येथे जावुन तलाठी सोनवणे यांची भेट घेतली व माझे खरेदीखताची नोंद होणेबाबत अर्ज व खरेदीखताची सुची क्र. 2 ची छायांकित प्रत त्यांचेकडे जमा केली. त्यावेळी तलाठी श्री. सोनवणे यांनी माझा अर्ज घेवुन, आज मला मिटींग आहे, मी तुम्हाला उदया फोन करतो असे सांगितले. मला दि. 01/01/2025 रोजी तलाठी सोनवणे यांचा फोन आला नाही परंतु मला खाजगी इसम करण जगताप यांचा फोन आला ते मला म्हणाले की, ''मला तलाठी सोनवणे यांचा फोन आला होता, तुम्ही त्यांच्याकडे खरेदीखताचे कागदपत्र दिले का, त्यांनी ते कागदपत्र माझ्याकडे दयायला सांगितले होते ना, तुम्ही डायरेक्ट

त्यांच्याकडे कशाला कागदपत्र दिले, मला त्यांनी तुमच्याकडुन पैसे घ्यायचे सांगितले आहे.'' असे म्हणाले. मी त्यांना उदया तुमची भेट घेतो असे सांगितले. खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी पैशाची आवश्कता नाही हे मला माहिती आहे. खाजगी मदनिस श्री. करण जगताप हे त्यांचेकरीता व तलाठी श्री. सोनवणे यांचेकरीता मागत असलेली रक्कम ही लाच असल्याचे मला समजले. मला तलाठी श्री. सोनवणे यांना व त्यांचे खाजगी मदतनीस श्री. करण जगताप यांना लाच देण्याची ईच्छा नाही. वगैरे मजकुराची तक्रार सांगीतली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 11/31 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे खाजगी मदतनिस जगताप यांचे साईसिटी परिसरातील ऑफीस कडे गेलो. तेथे गेल्यावर करण जगताप यांनी फोनव्दारे तहसिल कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालय येथे येण्यास सांगितले असता, मी व पंच नं. 1 असे साईसिटी परिसरातुन तहसिल कार्यालय कोपरगाव येथे गेलो. कोपरगाव तहसिल कार्यालय येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचे समोर खाजगी मदतनीस करण जगताप भेटले. त्यांनी मला मी खरेदी केलेल्या सदनिका क्र. 105 च्या खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी त्यांचे करीता व तलाठी सोनवणे यांचे करीता एकुण 6500/-रुपये माझ्याकडे लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 12/09 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता खाजगी मदतनीस करण जगताप यांनी खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी त्यांचे करीता व तलाठी सोनवणे यांचे करीता एकुण 6500/-रुपये माझ्याकडे लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी माझ्या बचतीतुन 6,500/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 13 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहून घेण्यात आले. त्यानंतर नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला. त्यानंतर जगताप यांचेविरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले.

श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर थोडया वेळाने खाजगी मदतनीस करण जगताप यांचा मला फोन आला व त्यांनी नोंदीचे काय करायचे असे विचारले असता, मी त्यास कुठे आहे असे विचारले, त्याने साई सिटी ऑफिस येथे आहे असे सांगितले. मी त्यास अर्धा पाऊन तासात तिकडे येतो, फोन करतो असे सांगितले. सदरचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी जगताप यांना लाचेची रक्कम देण्याकरिता त्यांचेशी भेटण्याचे ठिकाण निष्चित करण्याबाबत मला विचारले असता मी कळविले की, '' करण जगताप याचे ऑफिसमध्ये लोकांची गर्दी असल्याने तो तेथे पैसे स्विकारणार नाही, लाचेची रक्कम देण्याकरीता मी जगताप यांना मी राहतो त्या साई रेसिडेन्सी इमारतीचे पार्कींग येथे बोलवुन घेतो, त्या ठिकाणी जगताप यांचेविरूध्द सापळा आयोजित करा असे कळविले. त्यानुसार जगताप यांचेविरूध्द सदर ठिकाणी सापळा लावण्याचे ठरले. त्यानंतर मी, पंच नं. 1 असे माझेकडील दुचाकीने व पो. उपअधी.श्री. त्रिपुटे आणि सापळा पथक असे शासकिय वाहनाने साई रेसिडेन्सी बिल्डींग येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी जगताप यास फोन करुन साई रेसिडेन्सी इमारतीकडे येण्याबाबत कळविले, त्यावर करण जगताप याने येतो म्हणुन सांगितले.

त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला. मी व पंच क्र. 1 असे 17/28 वा. साई रेसिडेन्सी इमारतीचे पार्किंगसमोर थांबुन राहिलो. तसेच सापळा पथक पार्किंगच्या आजुबाजुस सापळा लावुन

थांबलेले होते. तेथे खाजगी मदतनीस करण जगताप आले त्याचेत व माझे नोंदीच्या संदर्भात चर्चा झाली. मी त्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे 6,500/-रुपये आणले आहेत असे म्हणुन लाचेची रक्कम करण जगताप यांचेसमोर धरून त्यांना चेक करुन घेण्याबाबत विनंती केली असता खाजगी मदतनीस करण जगताप यांनी लाचेची रक्कम स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन घेवुन पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.त्रिपुटे, सापळा पथक व पंच क्र.2 असे आले, पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे साहेबांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता मी समोर उभे असलेले खाजगी मदतनीस करण जगताप यांचेकडे बोट दाखवुन हे करण जगताप आहेत त्यांनी लाच रक्कम स्विकारुन पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने सदर लाच रक्कम ताब्यात घेतली व सोबतच्या कर्मचा-यांच्या मदतीने करण जगताप यांना ताब्यात घेतले. श्री. त्रिपुटे यांनी करण जगताप यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गणेश नारायण जगताप, वय 28 वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. यश बंगला, साई विश्व अपार्टमेंट जवळ, साईसिटी परिसर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर असे सांगितले. श्री. त्रिपुटे यांनी लाचेच्या नोटांच्या नंबरची खात्री करण्यात आली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी मला थोडे बाजुला बाहेर उभे राहण्यास सांगीतले, शासकिय वाहनात करण जगताप यांच्या तपासण्या केल्या. त्यानंतर मला बोलवुन माझ्या हाताच्या व पॅन्टच्या खिशाच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यावेळी जगताप यांनी माझा एकट्याचा या पैशाशी संबंध नाही. मी सदरची रक्कम तलाठी सोनवणे यांचे सांगणेवरून मागणी केली व स्विकारली आहे. मी तलाठी सोनवणे यांना फोन लावतो असे म्हणाले व फोन लावुन तलाठी सोनवणे काय बोलतात ते तुम्ही ऐका, मग तुमच्या लक्षात येईल असे म्हणाले. त्यानंतर करण जगताप याने त्याचे मोबाईल वरुन तलाठी सोनवणे यांना फोन केला असता त्यांनी कामात आहे असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर थोडयावेळाने पुन्हा करण जगताप याने तलाठी सोनवणे यांना फोन केला व फोनवर करण जगताप याने तलाठी यांना आघाव यांनी साडे सहा हजार रुपये दिले होते. तुमचे पैसे दयायचे होते, तुम्ही कुठे आहेत, तिकडे येवु का असे विचारले असता तलाठी सोनवणे यांनी ठिक आहे, इकडे चक्कर असेल तर ये मग असे म्हणाले, त्यावर जगताप यांनी येवू का असे विचारले असता सोनवणे तलाठी यांनी ठिक आहे, चालतयं, ये इकडे असे म्हणाले. सदर संभाषणावरुन तलाठी श्री. सोनवणे यांनी जगताप यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रकमेस प्रोत्साहन देवुन संमती दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तलाठी सोनवणे यांना ताब्यात घेण्यात आले. श्री. त्रिपुटे यांनी सोनवणे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गणेश वैजिनाथ सोनवणे, वय 40 वर्षे, धंदा नोकरी, तलाठी सजा कोपरगाव, रा. रो हाउस नं. 4 साई हार्मोनी कॉलनी, (सचिन चिमाजी सोनवणे यांचे घरी भाडयाने) साईसिटी परिसर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर जगताप व सोनवणे यांना ताब्यात घेवुन श्री. त्रिपुटे व सापळा पथक कोपरगाव शहर पोलीस स्टेशनकडे निघाले. मला श्री.त्रिपुटे यांनी कोपरगाव शहर पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कोपरगाव शहर पोलीस स्टेशन येथे आलो. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 02/01/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 11/31 ते 12/09 वा. दरम्यान तलाठी सोनवणे, कोपरगाव तलाठी कार्यालय यांचे खाजगी मदतनीस करण जगताप यांनी माझेकडे कोपरगाव तहसिल कार्यालयाचे आवारात दुय्यम निबंधक कार्यालयाचे समोर, ' मी खरेदी केलेल्या सदनिका क्र. 105 च्या खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी त्यांचे स्वतः करीता व तलाठी सोनवणे यांचे करीता एकुण 6500/-रुपये लाचेची मागणी करुन, सदर लाच रक्कम करण जगताप यांनी लाचेचा सापळा कारवाई वेळी 17/28 ते 17/34 वा. दरम्यान माझेकडुन साई सिटी परिसरातील साई रेसिडेन्सी इमारतीचे पार्किगसमोर स्विकारली आहे. तसेच जगताप यांनी तलाठी सोनवणे यांना फोन करुन तुम्ही सांगितल्या प्रमाणे 6500/- रुपये स्विकारले बाबत फोनवरुन सांगितले असता, त्यास तलाठी श्री. सोनवणे यांनी सदर लाच रक्कमेच्या स्विकृतीला प्रोत्साहन देवुन संमती दर्शविली असल्यामुळे माझी 1) आरोपी खाजगी इसम करण नारायण जगताप, वय 28 वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. यश बंगला, साई विश्व अपार्टमेंट जवळ, साईसिटी परिसर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर, 2) आरोपी लोकसेवक गणेश वैजिनाथ सोनवणे, वय 40 वर्षे, धंदा नोकरी, तलाठी सजा कोपरगाव, रा. रो हाउस नं. 4 साई हार्मोनी कॉलनी, (सचिन चिमाजी सोनवणे यांचे घरी भाडयाने) साईसिटी परिसर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

समक्ष (विकास पंढरीनाथ आघाव)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BHAGWAN HARIBHAU MATHURE(I (Inspector)) / PCMH79922

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signa[illegible]ge,**
**Police Stat[illegible]**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHAGWAN HARIBHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH79922